3 OCT 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ परिसर श्रमदानातून चकाचक

## गांधी जयंतीला अभियान; जनजागृतीमुळे प्लास्टिक कचरा कमी

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील अधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी स्वच्छता मोहीम राबवून सोमवारी महात्मा गांधीजी यांना अभिवादन केले. विद्यापीठ परिसरातील रस्त्याकडेची काटेरी झुडपे, गवत, परिसरातील कचरा उचलून साफसफाई केली.

विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी सकाळी आठ ते दहा या कालावधीत स्वच्छ भारत अभियानांतर्गत विद्यापीठाच्या परिसरात स्वच्छता अभियान राबविले. प्रशासकीय सेवकांनी त्यांना नेमून दिलेल्या एनसीसी भवन गेटपर्यंतच्या परिसरामध्ये, तर अधिविभागांनी आपापल्या परिसरांत स्वच्छता केली. अभ्यासिकेमधील विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाचा परिसर चकाचक केला. प्र-कुलगुरू डॉ. शिर्के, कुलसचिव डॉ. नांदवडेकर आणि डॉ. गुरव यांनी मुख्य प्रशासकीय इमारतीसमोरील शिवपुतळ्यासह उद्यान परिसर स्वच्छ केला. अभियानानंतर मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांचे पूजन करुन त्यांना अभिवादन केले. त्यानंतर गांधी अभ्यासकेंद्राच्या संचालिका डॉ. भारती पाटील यांनी अहिंसा, शांततेची, स्वच्छतेची शपथ दिली.



शिवाजी विद्यापीठात सोमवारी महात्मा गांधी जयंतीनिमित्त स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यात विद्यार्थी सहभागी झाले होते.

### मोहिमेचे वैशिष्ट्य

गेल्या दोन वर्षांपासून स्वच्छता अभियानामध्ये मोठ्या प्रमाणात प्लास्टिकमुक्ती करण्यात आली. परिणामी सर्वच घटकांमध्ये याविषयी झालेल्या जागृतीमुळे यंदाच्या सफाईदरम्यान अत्यल्प प्लास्टिक सापडले, हे या मोहिमेचे वैशिष्ट्य ठरले. मानव्यविद्या इमारतीमधील अधिविभागांनी परिसरात प्लास्टिकमुक्ती व छत स्वच्छता मोहीम राबविली.

3 OCT 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ परिसर झाला चकाचक



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या स्वच्छता मोहिमेत सहभागी विद्यार्थी.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजीविद्यापीठात दरवर्षीप्रमाणे यंदाही राबविण्यात आलेल्या विद्यापीठ परिसर स्वच्छता अभियानाला शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक तसेच विद्यार्थ्यांचा उत्साही प्रतिसाद लाभला. रस्त्याकडेला वाढलेली काटेरी झुडपे, गवत, परिसरात पडलेला कचरा अशा प्रकारचा कचरा आज मोठ्या प्रमाणात साफ करण्यात आला.

गेल्या दोन वर्षांपासून स्वच्छता अभियानामध्ये मोठ्या प्रमाणात प्लास्टिकमुक्ती करण्यात आली होती. परिणामी सर्वच घटकांमध्ये याविषयी झालेल्या जागृतीमुळे यंदाच्या सफाईदरम्यान अत्यल्प प्लास्टिक सापडले. हे या मोहिमेचे वैशिष्ट्य ठरले. मानव्यविद्या इमारतीमधील अधिविभागांनी परिसरात प्लास्टिकमुक्ती व छत स्वच्छता मोहीम राबविली.

## स्वच्छता मोहिमेत विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या पुढाकारातून स्वच्छता मोहिमेतून विद्यार्थ्यांसह सर्व संबंधित घटकांमध्ये झालेल्या जागृतीचेच हे लक्षण आहे, अशी भावना प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी यावेळी व्यक्त केली.

प्र-कुलगुरू डॉ. शिर्के, कुलसचिव डॉ. नांदवडेकर व श्री. गुरव यांनी मुख्य प्रशासकीय इमारतीसमोरील शिवपुतळ्याचा उद्यान परिसर स्वच्छ केला. त्यानंतर त्यांनी परीक्षा भवनसह कॅम्पसवरील प्रत्येक अधिविभागाला प्रत्यक्ष भेट देऊन स्वच्छता अभियानाची पाहणी केली. गांधी अभ्यास केंद्राच्या संचालक डॉ. भारती पाटील यांनी उपस्थितांना अहिंसा, शांततेची तसेच स्वच्छतेची शपथ दिली. विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने सर्व उपस्थितांसाठी नाष्ता व चहापानाची सुविधा करण्यात आली. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 OCT 2017
लोकमत

# 'जलस्थापत्या'चे जुने तंत्रज्ञान आजही उपयुक्त

## विद्यापीठातील पहिल्या राष्ट्रीय युवा परिषदेतील सूर

लोकमत न्यूज नेटवर्क



कोल्हापूर : जुन्या काळातील जलस्थापत्याचे तंत्रज्ञान आजच्या काळातही तितकेच उपयुक्त आहे. त्याच्या आधारे सध्याच्या प्रकल्पांची उभारणी केली तर ते अधिक मजबूत, टिकावू अन् फायदेशीर ठरतील, असा सूर येथे झालेल्या पहिल्या राष्ट्रीय युवा जलस्थापत्य परिषदेत व्यक्त करण्यात आला.

भारतीय जलसंस्कृती मंडळ, शिवाजी विद्यापीठ आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्टस् महाराष्ट्र चॅप्टरच्यावतीने शिवाजी विद्यापीठात ही तीन दिवसीय राष्ट्रीय परिषद पार पडली. परिषदेचे उद्घाटन भारतीय जलसंस्कृती मंडळाचे अध्यक्ष दत्ता देशकर यांच्या अध्यक्षतेखाली आणि शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डी. के. शिर्के, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्टस् महाराष्ट्र चॅप्टर पुण्याचे अध्यक्ष सतीश माने यांच्या हस्ते जलपूजनाने झाले. यावेळी डीओटीचे प्रा. जयदीप बागी, आयआयए महाराष्ट्र चॅप्टरच्या कोल्हापूर शाखेचे अध्यक्ष सतीशराज जगदाळे, पर्यावरणशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. पी. डी. राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती.

कल्पना सावंत यांनी स्वागत केले. भारतीय जलसंस्कृती मंडळाच्या कोल्हापूर शाखेचे अध्यक्ष डॉ. अनिलराज जगदाळे यांनी प्रास्ताविकात परिषदेच्या आयोजनाचा हेतू सांगताना समन्यायी पाणी वाटपाचे महत्त्व विषद केले. प्र-कुलगुरु शिर्के यांनी पूर्वजांचे जलस्थापत्याबाबतचे तंत्रज्ञान नव्या पिढीने आत्मसात करुन त्याचा योग्य ठिकाणी वापर करावा, असे आवाहन केले. दत्ता देशकर यांनी भारतीय जलसंस्कृती मंडळाच्या कार्याचा आढावा घेतला.

या परिषदेत अभियंते गजानन देशपांडे यांनी 'बीडच्या खजाना विहिरीची स्थापत्य कला' या विषयावर माहिती दिली. 'स्थापत्य कला आणि पाणी' या विषयावर बोलताना स्थापत्यामध्ये पाण्याचा वापर आणि पाण्यासाठी करण्यात आलेली वेगवेगळ्या प्रकारची बांधकामे यांची माहिती दिली. दत्ता देशकर यांचे 'जलव्यवस्थापन' या विषयावर व्याख्यान झाले. नांदेडचे प्रा. डॉ. प्रदीप वेसणेकर यांनी जुन्या बारवांचे (विहिरी) पुनरुज्जीवन करून आंबेजोगाईचा पाणी प्रश्न कसा सोडविला, यांची माहिती दिली. जैन इरिगेशनचे मधुकर खुटे यांनी ठिबक सिंचनामुळे पाणी, श्रम आणि पैशांची बचत कशी होते, हे सांगितले. सोलापूरचे प्रा. डॉ. अनिल नारायणेटकर यांनी नदी पुनरुज्जीवनाबाबत माहिती सांगितली.

कोकण पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता खलील अन्सारी यांनी कोकणातील पाणी, घाटावरील पाणी आणि प्रकल्प यांचे तुलनात्मक विवेचन केले. डॉ. गजानन राशिनकर यांनी लोणार सरोवरातील पाण्याचे रासायनिक गुणधर्म आणि त्याचे औषधी उपयोग सांगितले. समारोपाच्या दिवशी आर्किटेक्ट शिरिष बेरी यांचे 'पाणी आणि स्थापत्य कला' या विषयावर व्याख्यान झाले. नवी दिल्लीचे राजीव लुंकड यांनी जयपूरजवळील जलमहालाचे पुनरुज्जीवन कसे केले गेले, हे आपल्या व्याख्यानात सांगितले. या परिषदेत नागपूर, दिल्ली, नांदेड, औरंगाबाद, पुणे, सोलापूर, गोवा येथील प्रतिनिधींसह महाविद्यालयीन विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.